सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापूर.

# चतुर्थ श्रेणी कर्मचारी ( गट ड संवर्ग) पदभरती २०२५

## माहिती-पुस्तिका

महाराष्ट्र शासन

अधिष्ठाता यांचे कार्यालय, श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
जिल्हा न्यायालयाच्या समोर रंगभवन सिव्हील चौक सोलापूर

दुरध्वनी क्रमांक- 0217-2749418
ई-मेल- est4scsmsolapur@gmail.com
संकेतस्थळ-www.vmgmc.edu.in.

गट- ड (चतुर्थश्रेणी संवर्ग) ऑनलाईन स्पर्धात्मक परीक्षा-२०२५
सरळ सेवा पदभरती परीक्षे संदर्भात महत्वाच्या दिनांक/वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | २२/१०/२०२५ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | १२/११/२०२५ |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत | १२/११/२०२५, २३:५५ वाजेपर्यंत |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या आधी ७ दिवस |
| ५ | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे संकेतस्थळ | https://www.vmgmc.edu.in |
| **अ.क्र.** | **तपशिल** | **शेरा** |
| १ | माहिती पुस्तिका, ऑनलाईन जाहिरात आणि इतर माहिती उपलब्ध असलेले संकेत स्थळ | https://www.vmgmc.edu.in |
| २ | ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध असणारे संकेत स्थळ | जाहिरातीत नमूद पदाकरीता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) संकेतस्थळावर परीक्षेच्या किमान ७ ( सात ) दिवस अगोदर त्याच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांना त्यांच्या ई-मेल आय डी वर /भ्रमणध्वनीवर संदेशाद्वारे कळविण्यात येईल. |
| ३ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |
| ४ | ऑनलाईन परीक्षेचे केंद्र | |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचे वेळापत्रक | |
| ६ | ऑनलाईन परीक्षेचा निकाल | |

**परीक्षा ही Computer Based Test ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकाच दिवशी एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित केल्या गेल्यास किंवा अनेक दिवस परीक्षा आयोजित केल्यास सर्व सत्रातील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व त्याची कठीणता तपासण्यात येऊन त्याचे समानीकरण (Normalization) करुन गुणांक निश्चित करून निकाल जाहीर करण्यात येईल. सदर (Nomalization) सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील याची सर्व परीक्षार्थी यानी नोंद घ्यावी.**

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिनस्थ श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर या संस्थेतील चतुर्थश्रेणी संवर्गाच्या ( गट-ड ) रिक्त असलेल्या पदांच्या सरळसेवा भरतीकरीता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४ मे २०२२ व शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/ प्र.क्र.१३६/का.१३-अ,दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ अन्वये जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, सोलापूर यांच्या अधिपत्याखालील समितीस मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने सन २०२५ मध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील चतुर्थश्रेणी सवंर्गातील ( गट ड ) अनुशेषाची व खुल्या संवर्गाची सामाजिक आरक्षण तसेच समांतर आरक्षणानुसार विविध रिक्त असलेली पदे सरळसेवेने भरण्याकरीता जिल्हा निवड समितीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

चतुर्थश्रेणी सवंर्गातील ( गट ड ) पदांकरीता भरती प्रक्रियेदरम्यान पद संख्येत बदल करण्याचा अधिकार जिल्हा निवड समितीने राखून ठेवलेला आहे.

( डॉ. औदुंबर नेमिनाथ मस्के )

**सदस्य सचिव,**

जिल्हा निवड समिती, सोलापूर

श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर

चतुर्थश्रेणी संवर्ग (गट ड) पद भरती प्रक्रिया २०२५

(श्री कुमार आशिवाद )

**अध्यक्ष**

जिल्हा निवड समिती गट-ड

तथा जिल्हाधिकारी सोलपूर .

# अनुक्रमणिका सूची


| अ.क्र. | शिर्ष |
|---|---|
| १ | प्रस्तावना/परिचय |
| २ | व्याख्या |
| ३ | पात्रता |
| ४ | पद संख्या व  आरक्षणातील तरतूदी |
| ५ | खेळाडू आरक्षण |
| ६ | दिव्यांग आरक्षण |
| ७ | अनाथ आरक्षण |
| ८ | जात प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणी |
| ९ | वयोमर्यादा |
| १० | स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा वेळापत्रक व संचलन |
| ११ | उमेदवारांना समान गुण मिळाल्यास करावयाची कार्यवाही |
| १२ | निवड सूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
| १३ | निवड सूचीची कालमर्यादा |
| १४ | पद भरती प्रकियेची अंमलबजावणी |
| १५ | परीक्षा शुल्क |
| १६ | अर्ज करण्याची पध्दत |
| १७ | आचरण व शिस्त |
| १८ | अपील समिती |
| १९ | परीक्षा केंद्रावरील तक्रार निवारण समिती |
| २० | परीक्षा गैरप्रकार प्रकरणी करावयाची कार्यवाही |
| २१ | नियुक्ती |
| २२ | प्रमाणपत्रे |
| ९ | परिशिष्टये |
| | गट-ड (चतुर्थ श्रेणी संवर्ग) रिक्त पदांचा तपशिल **(परिशिष्ट A)** |
| | गट-ड (चतुर्थ श्रेणी संवर्ग) पद निहाय पद भरती नियम आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता **(परिशिष्ट-B)** |
| | ऑनलाईन अर्ज करण्या संबंधी मार्गदर्शन  **(परिशिष्ट C)** |
| | संवैधानिक आरक्षण **(परिशिष्ट D)** |
| | दिव्यांग आरक्षण **(परिशिष्ट E)** |
| | वैद्यकीय स्वास्थ (Fitness) प्रमाणपत्र **(परिशिष्ट F)** |
| | स्पर्धा परीक्षेसाठी उपलब्ध गट-ड (चतुर्थ श्रेणी संवर्ग) संवर्गाच्या रिक्त  व समांतर आरक्षणाबाबत तक्ता **(परिशिष्ट G)** |
| | खेळाडू उमेदवाराकरीता प्रमाणपत्राचा नमुना (Form No.४) **(परिशिष्ट H)** |
| | लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र शपथ पत्राचा नमुना **(परिशिष्ट I)** |
| | ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया **(परिशिष्ट J)** |
| | लेखनिक व अनुग्रह  कालावधी **(परिशिष्ट K)** |
| | दिव्यांग व्यक्तींकरीता लेखनिका संबंधीचे वैद्यकीय प्रमाणपत्र **(परिशिष्ट K १)** |
| | दिव्यांग व्यक्तीचा लेखनिका करीता विनंती अर्ज **(परिशिष्ट K २)** |
| | परीक्षेचा अभ्यासक्रम **(परिशिष्ट L १) आणि  (परिशिष्ट L २)** |

# श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर
## स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा - २०२५
## गट - ड ( चतुर्थश्रेणी ) संवर्ग पदभरती २०२५

१. श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर या संस्थेमधील चतुर्थ श्रेणी संवर्गाच्या (गट-ड) रिक्त असलेल्या पदांच्या सरळसेवा भरतीकरीता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४ मे २०२२ व शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.१३६/ का.१३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, सोलापूर यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. व त्यानुसार गट - ड (चतुर्थ श्रेणी) संवर्गातील रिक्त असलेली विविध पदे ऑनलाईन स्पर्धात्मक परीक्षेच्या माध्यमातून भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

२. **व्याख्या:-**

२.१ **नोडल अधिकारी**: जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सदर परीक्षेकरीता नियुक्त केलेले अधिकारी असतील. नोडल अधिकाऱ्यांचे संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवर पर्यवेक्षण आणि संनियंत्रण राहील. मा. जिल्हाधिकारी, सोलापूर हे अपील समितीचे अध्यक्ष असतील. नोडल अधिकाऱ्यांना परीक्षेचे संचलन योग्यप्रकारे होण्यासाठी आणि परीक्षेची माहिती संबंधीतांना कळविण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी अधिकार असतील.

२.२ **अपील समिती**: जिल्हाधिकारी,सोलापूर यांच्या अध्यक्षते खालील जिल्हा निवड समितीही अपील समिती म्हणून कार्यरत असेल.सदर अपील समितीही परीक्षे संदर्भात उमेदवारांची निवेदने स्विकारुन त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही करेल.

२.३ **स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा**: श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर या संस्थेमधील चतुर्थ श्रेणी संवर्गाच्या ( गट-ड ) रिक्त असलेल्या पदांच्या सरळसेवा भरतीकरीता ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.

२.४ **अनुसूचित जाती**: महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या संवर्गाप्रमाणे.

२.५ **अनुसूचित जमाती**: महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या संवर्गाप्रमाणे.

२.६ **विमुक्त जाती (अ)**: महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या संवर्गाप्रमाणे.

२.७ **भटक्या जमाती (ब/क/ड)**: महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या संवर्गाप्रमाणे.

२.८ **इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग**: महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या संवर्गाप्रमाणे.

२.९ **आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग**: महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१ मे २०२१ प्रमाणे.

२.१० **माजी सैनिक**: महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय सा.प्र.वि. क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगष्ट २०१० प्रमाणे.

२.११ **खेळाडू:** महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१ जुलै २०१६ प्रमाणे.

**२.१२ दिव्यांग आरक्षण**: महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ प्रमाणे.

**२.१३ प्रकल्पग्रस्त उमेदवार**: महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६/अ, दिनांक ०३ फेब्रुवारी २००७ प्रमाणे.

**२.१४ भुकंपग्रस्त उमेदवार**: महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक एईएम-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६/अ, दिनांक ०३ फेब्रुवारी २००७ प्रमाणे. (उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहिल.)

**२.१५ आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य (पत्नी, मुलगी, मुलगा)**: महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय महसुल व वने विभाग क्रमांक एससीआय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी २००६ प्रमाणे.

**२.१६ अनाथ उमेदवार**: महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का ०३, दिनांक २३ ऑगष्ट, २०२१ प्रमाणे.

**२.१७ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, १९९१ च्या भारत सरकार जनगणना कार्यात कार्यरत कर्मचारी, १९९४ नंतर निवडणूक कार्यात सहभागी कर्मचारी (P.T.CENSUS)**: महाराष्ट्र शासनाचा सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/ १६-अ, दिनांक ०६.१०.२०१० प्रमाणे.

२.१८ **महिला आरक्षण**: महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र.८३/२००१/मसेआ/२०००/प्र.क्र.४१५/शाखा-२, दिनांक २५.०५.२००१ व शासन निर्णय क्रमांक महिला २०२२/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिलांनी तसेच सर्व मागासप्रवर्गातील महिलांनी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेली आहे. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागासप्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र आयुक्त, महिला व बाल विकास विभागाकडून तपासणी करुन घेण्यात येईल. महिलांकरीता आरक्षित पदावर पात्र उमेदवार महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास, त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरुष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

२.१९ **पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार** - शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोर २००९ अन्वये पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे. वय शिथिलता सा.प्र.वि.शा.नि.क्र.अंशका-१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ,दि.०२/०१/२०१९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

२.२० **खुल्या प्रवर्गातील आर्थीकदृष्टया दुर्बल घटक**

सदरचे आरक्षण हे खुल्या प्रवर्गातील आर्थीकदृष्टया दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेले आहे. खुल्या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही. या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या/उमेदवाराच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षीक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटूंबीय महाराष्ट्र राज्यात दिनांक १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी विहित नमुन्यातील निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२.२१ **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ:** महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत असलेले शिक्षण मंडळ.

## ३. पात्रता

३.१ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे.

३.२ उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवाराने अधिवास प्रमाणपत्र मागणी केल्यावर सादर करणे अनिवार्य राहील.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक मकसी १००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषीक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. सदर उमेदवारांनी ८६५ गावातील १५ वर्षाचे रहिवाशी वास्तव्य असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील. **सदर उमेदवारांना सामाजिकदृष्टया मागासप्रवर्गांपैकी कोणत्याही प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय ठरत नाही.**

३.३ शैक्षणिक पात्रता (महाराष्ट्र शासनाचे राजपत्र क्रमांक एसआरव्ही २०१४/प्र.क्र.३२२/का-१२, दिनांक ०६ जून २०१७ अन्वये)

**सर्व पदांसाठी** उमेदवाराची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण ही पात्रता असेली पाहिजे.

३.४ उमेदवाराला मराठीचे ज्ञान ( लिहीता वाचता येत ) असावे.

३.५ उमेदवाराने शैक्षणिक पात्रता ही अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांका पर्यन्त धारण केलेली असावी. जर उमेदवाराने अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांका नंतर शैक्षणिक पात्रता धारण केली असेल तर अशा उमेदवाराला कोणत्याही कारणास्तव परीक्षेसाठी पात्र ठरविले जाणार नाही.

३.६ उमेदवारास स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षेस बसू दिले याचा अर्थ सदरील उमेदवारास सदरील पदावरील नियुक्तीसाठी पात्र ठरविले असा नाही.

३.७ उमेदवाराने वैद्यकीय स्वास्थ प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. (ANNEXURE -F)

३.८ उमेदवाराने रुजू होतांना सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या मुळ प्रति पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

३.९ उमेदवाराने लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (ANNEXURE -I) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०००/सीआर-१७/२०००/१२, दिनांक २८ मार्च २००५ आणि शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०००/सीआर १७/२०००/१२, दिनांक ०१ जुलै २००५.

३.१० ज्या उमेदवाराला घटनात्मक अथवा / आणि समांतर आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल त्याने सदर बाब स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षेच्या आवेदन पत्रात नमूद करणे आवश्यक राहील. असे आवेदन पत्रात नमूद न केल्यास, सदरील उमेदवाराच्या घटनात्मक अथवा / आणि समांतर आरक्षणाबाबत निर्णय घेतला जाणार नाही.

३.११ घटनात्मक आरक्षणासाठी केवळ महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचित नमूद करण्यात आलेल्या जाती / जमातीं / संवर्गास ग्राहय असतील.

३.१२ उमेदवाराची निवड ही उमेदवाराने पडताळणीसाठी सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारेच केली जाईल. (उमेदवाराने सदरील प्रमाणपत्रांच्या ऐवजी प्रमाणपत्रांच्या केवळ पावत्या सादर केल्यास, व नंतर प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.) उमेदवाराने त्याची मुळ प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. (उदा.उमेदवार हा विमुक्त जाती/भटक्या जमाती/इतर मागासवर्गीय/विशेष मागासवर्गीय असेल तर त्याने वैध जात पमाणपत्र व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा सदरील उमेदवाराचा खुल्या प्रवर्गासाठी विचार केला जाईल.) अशा प्रकारे अंतिम गुणवत्ता यादी तयार झाल्यानंतर व प्रसिध्द झाल्या नंतर त्यामध्ये कोणताही बदल कोणत्याही कारणास्तव केला जाणार नाही. नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र हे दिनांक ३१.०३.२०२५ किंवा त्यानंतरच्या दिनांकापर्यन्त वैध असले पाहिजे.

३.१३ उमेदवाराची मागास प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/इतर मागासवर्गीय/विशेष मागास प्रवर्ग) निवड झाली असल्यास त्याला तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. त्याच्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यानंतर त्याला कायमची नियुक्ती देण्यात येईल. मागासवर्गीय उमेदवाराने निवड प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधीत जात पडताळणी समितीकडून, सहा महिन्याच्या आत, जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३.१४ विमुक्त जाती/भटक्या जमातीसाठी असलेले आरक्षण हे अंतर्गत परिवर्तनीय (Inter-changeable) असेल. जर वरील प्रवर्गापैकी एखाद्या प्रवर्गातील योग्य आणि पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास, दुसऱ्या प्रवर्गातील उपलब्ध उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

३.१५ नियुक्त झालेले उमदेवार हे निवृत्ती वेतनासाठी महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार डीसीपीएस (अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजना) अंतर्गत NPS (राष्ट्रीय सेवा निवृत्ती वेतन योजना) करीता पात्र असतील. (शासन निर्णय क्रमांक अंनिया-१०/०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑगष्ट २००५ आणि शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दिनांक २७ ऑगष्ट २०१४)

४. **पद संख्या व आरक्षणा संदर्भात सर्वसाधारण तरतुदी:-**

४.१ भरावयाच्या उपरोक्त संवर्ग / पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचा तपशिल शासनाच्या मागणीनुसार आहे. तसेच पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

४.२ शासनाकडून पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल प्राप्त झाल्यास याबाबतची माहिती / बदल वेळोवेळी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

४.४ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्याबाबत तसेच (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांना नॉन क्रिमी लेअरमध्ये मोडत असल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच महिला व बाल विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक महिला २०२२/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे २०२३ नुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेचसर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

४.५ विमुक्त जाती अ, भटक्या जमाती ब, भटक्या जमाती क, भटक्या जमाती ड प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतर परिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधीत प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणा प्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.६ अर्ज करतांना एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषीत केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधीत जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.७ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगष्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३८/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.८ आर्थीक दृष्टया दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग राआधो-४०१९/ प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.९ अद्ययावत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र / आर्थीक दृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.१० कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोक प्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

५. **खेळाडू आरक्षण**

**५.१** शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ०१ जुलै २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ११ मार्च २०१९ व शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर २०१९ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**५.२** प्राविण्य प्राप्त खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रिडाविषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

**५.३** खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्यास तो खेळाडू उमेदवार आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो. याविषयी पडताळणी करता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधीत विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वी सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**५.४** कागदपत्रे पडताळणीच्या वेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले उमेदवार निवडीकरीता पात्र ठरतील. याविषयाचे "सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल"सादर केला असेल तरच उमेदवाराचा संबंधीत संवर्गातील खेळाडू या आरक्षित पदावर शिफारसी/ नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**५.५** एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे पडताळणी करण्याकरीतासंबंधीत उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

६. **दिव्यांग आरक्षण**

६.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक दिव्यांग २०१८/ प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

६.२ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०२१/प्र.क.५७/२१/वैसेवा-१, दिनांक १७ जून २०२१ नुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या आस्थापनेवरील गट ड (वर्ग ४) या संवर्गाची पदे दिव्यांग शासन सेवेसाठी सुनिश्चित केली आहेत, असे उमेदवार त्या पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

६.३ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकुण पद संख्येपैकी असतील.

६.४ दिव्यांग उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

६.५ लक्षणिय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ ईच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नविन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

६.६ सर्वोपचार रुग्णालय सोलापूर या आस्थापनेवरील सहा ( ०६ ) पदे दिव्यांगकरीता राखीव आहेत.

**७. अनाथ आरक्षण**

७.१ अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-३, दिनांक ०६ एप्रिल २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

७.२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

७.३ प्रस्तुत पदासाठी अर्ज करतांना अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी दिनांक ०६ एप्रिल २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारीत नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

७.४ अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास अनुसूचित जाती वर्गासाठी निश्चित करण्यात आलेले किमान गुणवत्ता पात्रता निकष लागू राहतील.

**७.ब पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना समांतर आरक्षण**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाक क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ,दि.२७/१०/२००९ व अषंका-१९१३/प्र.क्र.५७ /२०१३/१६-अ,दि१९/०९/२०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्याची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचे कडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**८. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती अ, भटक्या जमाती ब, भटक्या जमाती क, भटक्या जमाती ड, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्गीय उमेदवारांना संबंधीत आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**९. वयोमर्यादा:**

९.१ जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी **उमेदवारांचे वय हे अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी** गणण्यात येईल.

९.२ सदर सर्व पदांसाठी किमान वय १८ वर्ष पूर्ण झालेले असावे व कमाल वय ३८ वर्षापेक्षा ( मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षापेक्षा ) जास्त नसावे.

९.३ तसेच सन-१९९१ चे जणगणना कर्मचारी,१९९४ चे नंतर निवडणूक कर्मचारी व स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य यांच्या करिता उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. ( सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक:-६ ऑक्टोंबर २०१०.)

खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे उच्च वयोमर्यादा ही घटनात्मक आरक्षण व समांतर आरक्षणासाठी लागू राहील.

| Sr. No. | Constitutional/Parallel Reservations | Relevant Govt. Resolutions | Upper Age Limit |
|---|---|---|---|
| १ | Unreserved Candidate (OPEN) (अराखीव/खुला) | सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/ कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल २०१६ | ३८ वर्षे |
| २ | SC/ST/(VJ/NT१/NT२/NT३/OBC/ SBC) Constitutional Reserve Candidates/EWS (अजा/अज/विजा/भज-ब/भज-क/भज-ड/इमाव/विमाप्र/आदुघ) | १.सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/ कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल<br>२.सा.प्र.वि.शा.नि.क्र.राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१ मे २०२१ (EWS) | ४३ वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | Persons with Disability (दिव्यांग) | सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही १०९८/प्र.क्र.३९/९८/ १६-अ, दि.१६.०६.२००१ | ४५ वर्षे |
| ४ | Project Affected Person and Earth Quake Affected (प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त) | सा.प्र.वि.शा.नि.क्र.प्रकल्प-००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/ ०६/१६/अ,दिनांक०३.०२.२००७ | ४५ वर्षे |
| ५ | Orphan (अनाथ) | महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का ०३, दिनांक २३ ऑगष्ट, २०२१ प्रमाणे. | ४३ वर्षे |
| ६ | Ward of Ex-Freedom fighter/Census/Election Employees (माजी स्वातंत्र्य सैनिकाचा पाल्य ,१९९१ चे जनगणना कर्मचारी, १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी ) | सा.प्र.वि.शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/ २०१०/१६ -अ, दिनांक ०६.१०.२०१० | ४५ वर्षे |
| ७ | अंशकालीन कर्मचारी शा.नि.क्र.अशंका१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ,दिनांक:-०२/०१/२०१९ | सा.प्र.वि.शासन निर्णय क्रमांक:- पअंक-१००९/प्र.क्र.२००/ २००९/१६ -अ, दिनांक २७.१०.२००९ | ४६ वर्षे |
| ८ | Sports Person (प्राविण्य प्राप्त खेळाडु ) | महाराष्ट्र शासन ,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक:-राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२,दिनांक:-०१ जुलै २०१६ | ४३ वर्षे |
| ९ | Ex- Serviceman (माजी सैनिक) | सा.प्र.वि.शा.शुध्दीपत्रक.क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगष्ट, २०१० अन्वये माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील, तसेच अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील. | |

**१०. स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा -२०२५ वेळापत्रक आणि संचलन:-**

**१०.१** सदर परीक्षा महाराष्ट्रातील जिल्हयांच्या ठिकाणी संचलित केली जाईल. उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार असलेल्या पदांसाठी ऑनलाईन अर्ज करुन, सदर परीक्षेसाठी पात्र ठरल्यास परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या दिनांकास विहित वेळेत उपस्थित रहावे. उमेदवार एकापेक्षा जास्त संवर्गासाठी अर्ज करुन परीक्षेस बसू शकतात मात्र त्यासाठी त्यांनी प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

**१०.२ अ** परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने (COMPUTER BASED TEST) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येईल. एकुण १०० प्रश्न असतील प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील.

**१०.२ ब** ज्या पदांसाठी शारीरिक व व्यावसायिक चाचणी आवश्यक नाही अशा गट-ड मधील सर्व पदांकरीता उमेदवाराची निवड करतांना मराठी, इंग्रंजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकुण २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकुण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून निवड सुची तयार करुन निवड सूचितील पात्र उमेदवाराची गुणवत्तेनुसार नियुक्तीकरीता शिफारस करण्यात येईल.

गट ड संवर्गातील सुरक्षारक्षक/पहारेकरी व चौकीदार या पदांसाठी (महाराष्ट्र शासनाच्या पोलिस भरती नियमाप्रमाणे ) पुरुष उमेदवारांची किमान उंची १६५ से.मी.व छाती ७९-८४ से.मी. असावी. व महिला उमेदवारांची किमान उंची हि १५५ से.मी. असावी.ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे परीक्षेची प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिका याची प्रत उमेदवारांना मिळणार नाही. **ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका फेर तपासणी करण्यात येणार नाही.** याबाबत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, सोलापूर अथवा अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर अथवा परीक्षा घेणाऱ्या संस्थेशी संपर्क साधु नये.

१०.३ अंतिम गुणवत्ता यादीत ( FINAL MERIT LIST ) अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

१०.४ परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न नसेल.

१०.५ प्रश्नपत्रिका ही मराठी भाषेत असेल.

१०.६ निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती आदेश हे गुणवत्ता यादीनुसार दिले जातील. त्यानंतर मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाईल.

१०.७ जाहिरातीत नमूद पदाकरीता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) संकेतस्थळावर परीक्षेच्या किमान ७ (सात) दिवस अगोदर त्याच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी परीक्षा प्रवेश पत्राची प्रिंट संकेतस्थळावरुन काढून घ्यावी. उमेदवारांना त्यांच्या ई-मेल आय डी वर /भ्रमणध्वनीवर संदेशद्वारे कळविण्यात येईल.

१०.८ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश पत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा छायाप्रतिसह सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेशपत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.

१०.९ परीक्षा केंद्र

१. २. ३.

उमेदवारांनी उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्रांमधून परीक्षा केंद्र निवडावे.

(* सदरची परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने संगणकावर विविध सत्रात घेण्यात येणार असल्याने, उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्रच, उमेदवाराला मिळेल याची हमी देता येणार नाही. याची उमेदवाराने नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.)

परीक्षा प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जाईल.

परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादीबाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही.

उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे. यासंबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, सोलापूर अथवा अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर हे जबाबदार राहणार नाहीत.

१०.१० काही अपरीहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये / परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती **www.vmgmc.edu.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०.११ ओळख पटवणे -

१. परीक्षा केंद्रावर प्रवेश पत्रासह उमेदवाराचे ओळख पटविण्यासाठी उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र उदा.पॅन कार्ड/पारपत्र (Passport)/वाहनचालक परवाना (Driving License)/मतदार ओळखपत्र (Votor ID)/बँक आणि पोस्टचे फोटोसहितचे पासबुक/फोटासहित असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेजचे फोटोसहित ओळखपत्र/बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे.

रेशनकार्ड व शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.

१०.१२ परीक्षेला उशिरा येण्याबाबत - परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनीटे) असली तरी उमेदवारास ओळख पटविणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परीक्षेविषयीची सूचनाद्वारा माहिती देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

१०.१३ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४ मे २०२२ अन्वये गट ड मधील पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही.

**११. उमेदवारांना समान गुण मिळाल्यास करावयाची कार्यवाही:**

परीक्षेचा निकाल तयार करतांना, परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम खालील प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

अ. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

आ. समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र.अ नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ट असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

इ. वरील अनु.क्र. अ व आ या दोन्ही अटीमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशाप्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य क्रम देण्यात येईल.

ई. वरील अनु.क्र. अ, आ व इ या तीन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुणप्राप्त उमेदवारास प्राध्यान्यक्रम देण्यात येईल.

(टिप:- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एससीवाय-१२०५/ प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षते खालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्या प्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय.)

**१२.निवड सूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या:**

निवड सूचीही प्रवर्ग निहाय तयार करण्यात येईल. त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या खालीलप्रमाणे असेल.

| प्रवर्ग निहाय रिक्त पदांची संख्या | निवड सूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १ | ३ |
| २ ते ४ | रिक्त पदे+ रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते |
| ५ ते ९ | रिक्त पदे+ रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते |
| १० ते ४९ | रिक्त पदे+ रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते |

वरीलप्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करतांना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील पुर्णांक संख्या विचारात घेण्यात येईल.पद संख्या व आरक्षणामध्ये वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे. स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

१३. **निवडसूचीची कालमर्यादा:**

अ. निवड समितीने तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवड सूची व्यपगत होईल. (अंतिम परीक्षा निकाल जाहिर केल्यापासून एक वर्षासाठी सदरील निवड सूची विधीग्राहय राहील.)

ब. निवड समितीने तयार केलेल्या निवड सूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर ३० दिवसात रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता/अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रुजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवड सूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. मात्र अशी कार्यवाही निवड समितीने तयार केलेल्या निवड सूचीच्या कालमर्यादेत म्हणजेच एका वर्षाच्या आत करण्यात येईल.

१४. **पद भरती प्रक्रियेची अंमलबजावणी व संनियंत्रण:**

अ. जिल्हास्तरीय/प्रादेशिकस्तरीय/राज्यस्तरीय सरळ सेवेची पदे भरतांना शासनाच्या उपरोक्त निर्देशांची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याची जबाबदारी ही मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांची आहे.

ब. परीक्षे संदर्भात काही आक्षेप / वाद / न्यायालयीन प्रकरण / विधान मंडळ कामकाज विषयक बाबी उद्भवल्यास, त्यांची संपूर्ण जबाबदारी ही मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांची आहे.

क. पद भरती कालावधीत परीक्षां बाबतच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण कक्ष हा मा.जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयात स्थापन करण्यात आला आहे. सदर तक्रार निवारण कक्ष हा मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षते खालील जिल्हा निवड समिती मार्फत हाताळण्यात येईल.

१५. **परीक्षेचे शुल्क**: **उमेदवारास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज भरावा लागेल तसेच स्वतंत्र परीक्षा शुल्क अदा करावे लागेल.**

अ. खुला प्रवर्ग रुपये १०००/- (रुपये एक हजार मात्र),

ब. मागास प्रवर्ग/आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/अनाथ/दिव्यांग रुपये ९००/- (रुपये नऊशे मात्र). (माजी सैनिक/दिव्यांग माजी सैनिक यांना परीक्षा शुल्क माफ राहील.)

क. उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देयकर अतिरिक्त असतील.

ङ. परीक्षा शुल्क ना-परतावा (NON REFUNDABLE) आहे.

इ. परीक्षा शुल्क हे केवळ ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल.

ई. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षा अर्ज सादर केला परंतु ऑनलाईन परीक्षा शुल्क न भरल्यास परीक्षा अर्ज फेटाळला जाईल.

उ. परीक्षा शुल्क भरल्याबाबतचे ऑनलाईन चलनाची (पावती) प्रत ही ऑनलाईन पध्दतीने केलेल्या परीक्षा अर्जाच्या प्रतीसोबत तसेच कागदपत्रांच्या तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

ऊ. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

१६. **अर्ज करण्याची पध्दत:**

१६.१ केवळ ऑनलाईन पध्दतीने उमेदवारास **https://www.vmgmc.edu.in** या संकेत स्थळावर अर्ज सादर करता येईल.

१६.२ अर्धवट भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१६.३ पोष्टाने / कुरीअरने / हस्तपोच अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१६.४ उमेदवारास प्रवेशपत्र हे फक्त परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी असून, याचा अर्थ असा नाही की, उमेदवार हा निवड प्रक्रियेसाठी पात्र आहे.

१६.५ अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवाराने “उमेदवाराचे घोषणापत्र” काळजीपूर्वक वाचन केले पाहिजे. अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेले घोषणापत्र काळजीपूर्वक वाचूनत्यास संमती दिली पाहिजे.

**परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदसंख्येमध्ये बदल करणे तसेच भविष्यात शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल झाल्यास त्याबाबत संकेतस्थळावर प्रसिध्दतीच्या अधिन राहुन अटी व शर्थिमध्ये बदल करण्याचे अंतिम अधिकार शासनाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.**

Declaration by the Candidate

I hereby solemnly and sincerely affirm that each and every statement made and the entire information given by me in the application form is true and correct.

I have not concealed any material information, however, if any infroamtion submitted herein is found fraudulent, incorrect or untrue, I understand that I am liable to criminal proceedings and I also agree to forgo my seat in that particular post of cadre. I also understand that my selection post is also liable to be cancelled.

I have carefully read the rules and regulations of brochure and I agree to abide by them. I hereby accept in entire the legality, validity and correctness of these rules.

I understand by submitting this application, I have accepted the correctness, validity and/or justifiability of all these and that had I not accepted the correctness and validity of these rules, I would not be able to submit this application and further that it will not be open hereinafter to challenage and / or question validity and / or correctness of any rule or part thereof.

I undertake to submit all required original certificate at the time of uploading of document/physical document verification process as well as at the time of selection of the post as per rules, failing which I understand that my claim for selection shall not be granted.

If candidates agreed for aforesaid conditions then only he should click the “I agree” button so that his application form will be accepted.

The details of Online application / Registration procedure and process of online submission of application form are given in Annexure-J, applicants should follow these procedure/guidelines at the time of filling online application form.

**(उमेदवाराचे घोषणापत्र)**

मी याद्वारे विधीयुक्त पध्दतीने आणि प्रामाणिकपणाने घोषीत करतो की, मी माझ्या अर्जाच्या माहितीमध्ये सादर केलेला प्रत्येक शब्द आणि वाक्य हे सत्य आणि बरोबर आहे.

मी कोणतीही गोष्ट सक्षम प्राधिकाऱ्यांपासून लपवून ठेवलेली नाही. जर मी सादर केलेली माहीती ही फसवणूकीची अथवा चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझ्याविरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाऊ शकते याची मला जाणीव आहे. त्यामुळे मला गुणवत्तेनुसार माझी झालेली निवड किंवा मिळालेले पद रद्द होऊ शकते याची ही मला जाणीव आहे.

मी माहीती पुस्तीकेतील अटी व शर्तीचे काळजीपूर्वक वाचन केलेले असून मी त्यांचे पालन करीन. मी अर्ज सादर केल्यानंतर जर सदरील अर्ज हा अचूक, वैध, समर्थनिय नसेल तर सदरील अर्ज न्यायालयात आव्हान देण्यासाठी अथवा वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासाठी अथवा अचुकतेसाठी दावा करणार नाही.

मी सर्व मुळ प्रमाणपत्रेही अर्ज अपलोड करतांना आणि पडताळणीसाठी सादर करतांना तसेच निवड झाल्यावर पडताळणीसाठी सादर करीन. मी असे करु न शकल्यास माझी निवड ही परीक्षेच्या/निवडीच्या कोणत्याहीटप्प्यावर रद्द होऊ शकते याची मला जाणीव आहे.

उमेदवार जर वरील अटी व शर्ती मान्य करीत असेल तर त्याने "मला मान्य आहे" या बटनावर क्लिक करावे, असे न केल्यास उमेदवाराचा अर्ज स्विकृत होणार नाही.

१६.६ उमेदवारास अर्ज सादर करतांना काही समस्या उद्धवल्यास **https://www.vmgmc.edu.in** या लिंकवर अथवा ०२१७२७४९४०० / ०२१७२७४९४०१ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा.

१६.७ ऑनलाईन फी भरण्यासाठी दिनांक १२/११/२०२५, वेळ २३.५५ पर्यन्त मुदत राहील.

१६.८ उमेदवारांना परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठक व्यवस्था व इतर सूचना वेळोवेळी **www.vmgmc.edu.in** **या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यन्त वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत यास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाहीत.**

१६.९ भरती प्रक्रिया ही सोलापूर जिल्हयाच्या जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधिकार कक्षेत असेल.

१६.१० अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द करण्यात येईल.

१६.११ दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा तदनंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना समाप्त झाल्यामुळे शासनाने नव्याने दिनांक ०१.०४.२०१८ पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९७४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

## १७. आचरण आणि शिस्त

१७.१ गुणवत्ता यादीप्रमाणे निवड झालेल्या उमेदवाराला वैध प्रमाणपत्राच्यां मुळ प्रती पडताळणीसाठी सादर केल्यानंतर त्याची निवड होईल व नियुक्ती पत्र देण्यात येईल.

१७.२ निवड झालेल्या उमेदवाराला रुजू होण्यासाठी ३० (तीस) दिवसांचा कालावधी दिला जाईल. सदरील कालावधीत कोणत्याही प्रकारची वाढ दिली जाणार नाही. जर उमेदवार सदरील कालावधीत रुजू झाला नाहीतर त्याचे नाव गुणवत्ता सूची तसेच निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल.

१७.३ चारित्र्य-पूर्व चारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधीत उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

## १८. अपील समिती

जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षते खालील जिल्हा निवड समिती ही अपील समिती म्हणून कार्यरत असेल. सदर अपील समिती ही परीक्षे संदर्भात उमेदवारांची निवेदने/तक्रारी स्विकारुन त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही करेल.

१९. **परीक्षा केंद्रावरील तक्रार निवारण समिती:** प्रत्येक परीक्षा केंद्रावर खालील प्रमाणे तक्रार निवारण समिती कार्यरत असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | परीक्षा केंद्रपमुख |
| २ | सदस्य सचिव | पर्यवेक्षक |
| ३ | सदस्य | समवेक्षक |

सदरील समिती ही परीक्षेच्या दिवशी सकाळी ७.०० वाजल्या पासून त्या परीक्षा केंद्राची परीक्षा संपेपर्यन्त कार्यरत असेल. परीक्षा केंद्रावर एखादी तक्रार प्राप्त झाल्यास (उदा.प्रशासकीय अथवा तांत्रिक कारणामुळे प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वेळेत न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे वेळेच्या बाबतीत झालेले नुकसान, किंवा परीक्षे संदर्भातील एखादा महत्वाचा विषय), उमेदवार हा त्याच्या परीक्षा खोलीतील समवेक्षकाकडे तक्रार करेल. सदरील तक्रार प्राप्त झाल्यावर तक्रार निवारण समिती ही त्याच ठिकाणी निर्णय घेऊन नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करेल.

२०.**परीक्षा संदर्भातील गैरप्रकार झाल्यास करावयाची कार्यवाही:**

परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने परीक्षेच्या/निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर गैरप्रकार केला अथवा राजकीय/ आर्थीक/सामाजीक दबाव आणण्याचा प्रयत्न करुन परीक्षा/निवड प्रक्रियेत हस्तक्षेप केल्यास, सदरील उमेदवाराचे नाव परीक्षा प्रक्रिया, गुणवत्ता सूची तसेच निवड सूचीतून काढून टाकण्यात येईल.

परीक्षे संदर्भातील गैरप्रकाराच्या बाबतीत (Maharashtra prevention of malpractices Act universities, board and other specified Examination Act १९८२) नुसार कार्यवाही करण्यात येईल आणि अशा उमेदवारास परीक्षा तसेच निकालाच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र घोषीत करण्यात येईल.

परीक्षेच्या वेळेत किंवा एकुण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने :

१. अनुचित प्रकार करणे
२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे
३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणुक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी / लेखी / ईलेक्ट्रानीकली / मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठविणे, साठवणे
४. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा  दळणवळणाची (भ्रमणध्वनी किंवा तत्सम ईलेक्ट्रॉनीक) साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे
५. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी यांच्याशी अरेरावी करणे, उध्दटपणे वागणे, त्यांना लाच देऊ पाहणे अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कारवाईस सामोरे जावे लागेल. तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.(स्मार्टवॉच,डिजीटलवॉच,मायक्रोफोन ,मोबाईल फोन,कॅमेरा अंर्तभूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने,सिमकार्ड,ब्ल्यूटूथ,दुरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तु, ईलेक्ट्रानीक उपकरणे,वहया,नोटस,परवानगी नसलेली पुस्तके ,बॅग्ज परिगणक (Calculator) इत्यादि प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास , स्व्त:जवळ  बाळगण्यास ,त्याचा वापर करण्यास अथवा त्यांच्या वापरासाठी मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.  (मोबाईल जॅमरचा वापर प्रत्येक परीक्षा केद्रावर करण्यात येणार आहे.)

२१. **नियुक्ती**

२१.१ निवड झाल्यानंतर, वैध मुळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर, पात्र उमेदवारास श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथेच नियुक्ती देण्यात येईल.

२१.२ शासनाने परीक्षे संदर्भात वेळोवेळी घोषीत केलेल्या अधिसूचना/शासन निर्णय/शासन परिपत्रके/शासनाचे आदेशानुसार परीक्षा प्रक्रिया आणि निवड प्रक्रिया पार पाडली जाईल.

**२२. प्रमाणपत्रे:-**

उमेदवाराने रुजू होताना खालील नमूद मुळ वैध प्रमाणपत्रांच्या प्रती पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने सदरील प्रमाणपत्रांच्या सांक्षाकिंत सत्यप्रती द्विप्रतीत देखील सादर करणे आवश्यक आहे.

१. राष्ट्रीयत्वाचा पुरावा:- राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/पारपत्र
२. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र

३. वयाचा पुरावा:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र/जन्म दाखला (सफाईगार पदासाठी, पात्रता ही सातवी उत्तीर्ण असल्याने, सदरील उमेदवार शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण नसल्यास, त्याचा सातवी उत्तीर्ण दाखला ग्राहय धरण्यात येईल.)

४. वैद्यकीय स्वास्थ प्रमाणपत्र (विहीत नमुन्यात-परिशीष्ट F)

५. घटनात्मक आरक्षण (उमेदवार आरक्षीत प्रवर्गाचा असल्यास)

   १. जातीचा दाखला

   २. जात पडताळणी दाखला (उपलब्ध असल्यास. जात पडताळणी दाखला उपलब्ध नसल्यास सदरील उमेदवाराने रुजू झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे अनिवार्य राहील.)

   ३. नॉन क्रिमी लेअर (उन्नत आर्थीक गटात मोडत नसल्याचे) प्रमाणपत्र. विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, इमाव व विमाप्र- या प्रवर्गाच्या उमेदवारांनी ३१.०३.२०२५ पर्यन्त वैध असलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

   ४. आर्थीक दृष्टया मागास प्रवर्गासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले पात्रता प्रमाणपत्र.

६. समांतर आरक्षण:-

प्रकल्पबाधीत/भूकंपबाधीत/दिव्यांग/खेळाडू/माजी सैनिक/अनाथ/अंशकालीन पदवीधर कर्मचारी/ तसेच सन-१९९१ चे जणकगणना कर्मचारी ,१९९४ चे नंतर निवडणूक कर्मचारी व स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य यांनी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित व जारी केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

७. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्य

८. शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी कार्यालय प्रमुखांकडून नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य यांनी वयोमर्यादेत शिथीलता हवी असल्यास स्वातंत्र्य सैनिकांकडून तसे प्रमाणपत्र सादर करावे.

**महत्वाची सूचना**

उमेदवारांनी वेळोवेळी www.vmgmc.edu.in या संकेतस्थळावर अद्ययावत सूचना/माहितीसाठी संपर्क साधावा/भेट द्यावी.

# परिशिष्ट – A

# गट ड (चतुर्थ श्रेणी संवर्ग)

# रिक्त पदांचा तपशिल

# श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

| अ.क्र. | पदाचे नाव | संवर्ग | पदाची वेतनश्रेणी | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कक्षसेवक | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | १२३ |
| २ | बाहयरुग्ण विभाग सेवक | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०९ |
| ३ | शिपाई | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०३ |
| ४ | माळी | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०१ |
| ५ | पंपसहवर्ती | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०१ |
| ६ | क्ष किरण सेवक | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०१ |
| ७ | प्रयोगशाळा सेवक | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०२ |
| ८ | चतुर्थश्रेणी कर्मचारी | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०२ |
| ९ | रुग्णपटवाहक | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०१ |
| १० | सहाय्यक़ स्वयंपाकी | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०३ |
| ११ | परिचारिका जेवण विभाग सेवक | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०३ |
| १२ | भांडार सेवक | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०२ |
| १३ | पोस्ट मॉर्टेम रुम परिचर | ड | **एस – १ (रु.१५०००-४७६००)** | ०२ |
| | **एकुण** | | | १५३ |

# परिशिष्ट B

## गट ड (चतुर्थ श्रेणी संवर्ग) पद निहाय पद भरती नियम आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

| अ.क्र. | पदाचे नाव | पद भरतीचे नियम व शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
